शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)
वर्ष अकरावे : अंक तिसावा । एप्रिल-मे-जून २०२२

महाराष्ट्र शासन आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार प्राप्त
श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस, कोल्हापूर संचलित

## न्यू कॉलेज, कोल्हापूर

Reaccredited By NAAC Grade 'A+'

# १९९० नंतरची मराठी कादंबरी



३४. 'स्त्री' स्वातंत्र्याची अभिव्यक्ती करणारी सानियांची कादंबरी — डॉ. स्वप्निल बुचडे ............ १८४

३५. नव्वदोत्तर कादंबरीतील ग्रामसंवेदनांच्या पडझडीचे प्रतिबिंब — प्रा. संतोषकुमार डफळापूरकर .... १८८

३६. नव्वदोत्तर स्त्रीवादी कादंबरी स्त्री जाणिवा — प्रा. संगिता वामन सूर्यवंशी ....... १९२

३७. १९९० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीवरील जागतिकीकरणाचा प्रभाव — प्रा. रेखा काशिनाथ पसाले ...... १९६

३८. ग्रामीण कादंबरीकार : अनुराधा गुरव — प्रा. स्मिता कोंडीबा कालभूषण .. २००

३९. १९९० नंतरच्या स्त्री कादंबरीतील जाणिवा — प्रा. डॉ. जयकुमार चंदनशिवे ..... २०४

४०. 'अस्वस्थ नायक' व 'श्राद्ध' कादंबरीतील भाषा शैलीचा तौलनिक अभ्यास' — प्रा.सुजाता संजय चोपडे (इनामदार) २०८

४१. नव्वदोत्तरी कादंबरीचा आशय आणि स्वरुप — प्रा.डॉ.विजय अर्जुन रेवजे ......... २१२

४२. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी — प्रा. जयवंत शं. सुतार ............ २१५

४३. १९९० नंतरची भटक्या-विमुक्तांची कादंबरी — सौ. विजयालक्ष्मी विजयदेवगोजी .. २२१

४४. एकोणीशे नवोदत्तरी मराठी कादंबरीची दशा आणि दिशा — प्रा. डॉ. बाबासाहेब पिरगोंडा नाईक २२६

४५. 'नव्वदोत्तर मराठी कांदबरीतील समाजचित्रण' — डॉ. महावीर विठ्ठल कांबळे ...... २२८

४६. १९९० नंतरची महानगरीय कादंबरी — डॉ. मनीषा आझाद नायकवडी ... २३३

४७. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी — लिंगप्पा गुळाळे.................. २३८

४८. नव्वदोत्तरी आदिवासी कादंबरीतील निसर्ग जाणिवा — प्रा. रघुनाथ चंदर गवळी ......... २४२

४९. १९९० नंतरच्या स्त्रीलिखित मराठी कादंबरीमधील स्त्री जाणिवा — डॉ. राजश्री बंडोपंत पोवार ......... २४७

५०. नव्वदोत्तरी कालखंड आणि रंगनाथपठारे यांच्या कादंबऱ्यांतील अनुभवविश्व — प्रा. डॉ. प्रदीप पाटील ............ २५२

५१. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कांदबरी — प्रा. गणपत हनुमंत निमसे ........ २५८

५२. १९९० नंतरचे स्त्रियांचे कादंबरीलेखन — प्रा. डॉ. एकनाथ शामराव पाटील २६२

५३. १९९० नंतरच्या मराठी कादंबरीतील बेकारीचे चित्रण — अमोल सुभाष कवडे............. २६७

५४. नव्वदोत्तर मराठी कादंबरी : ग्राम आणि आदिवासी जीवन — अमोल चांदेकर .................. २७१

५५. १९९० नंतरच्या मराठी व हिंदी कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास — डॉ. भरत भीमराव जाधव ........ २७६

५६. 'नव्वदोत्तर आदिवासी कादंबरीतील स्त्रीजीवन' — डॉ. भीमराव खं. वानोळे ........ २८२

५७. १९९० नंतरची दलित कादंबरी — डॉ.चंद्रकांत शंकर कांबळे ........ २८७

५८. '१९९० नंतरची आदिवासी कादंबरीकारांची मराठी कादंबरी' — प्रा. दत्तू मेंगाळ .................. २९२

५९. १९९० नंतरची मराठी कादंबरी-विविधतापूर्ण विपुल प्रवाहित्व — डॉ. युवराज देवाळे .............. २९९

६०. जागतिकीकरणानंतरची कृषी जीवनाचा वेध घेणारी कादंबरी — प्रा. मोहन चव्हाण ............... ३०३

६१. १९९० नंतरच्या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन आणि भाषिक विशेष — डॉ. प्रकाश दुकळे ............... ३०९

६२. हिंदी उपन्यास साहित्य में प्रतिबिंबित बदलते मूल्य — प्रा.डॉ.सौ.एस.के.पाटील ......... ३१४

६३. Post-1990 Marathi Novel and the Language Change — Prof.Kirti Suhas Kurane ३१८

६४. Reflection of 'Educational Qualification' in Post 1990's Novels — Prof. Anita Powar ..... ३२१

६५. Contribution of Women Novelists In writing Marathi Novels After 1990s — Mrs. Daya Prasad Patil. ३२५


 ISSN No. 2319-6025

# नव्वदोत्तरी कालखंड आणि रंगनाथपठारे यांच्या कादंबऱ्यांतील अनुभवविश्व

प्रा. डॉ. प्रदीप पाटील
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

**प्रस्तावना**

मराठी साहित्याच्या वाटचालीत 'कादंबरी' या वाङ्मयप्रकाराला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. नव्वदोत्तरी कालखंडात रंगनाथ पठारे, श्याम मनोहर, भाऊ पाध्ये, प्रवीण बांदेकर, राजन गवस, कृष्णात खोत या कादंबरीकारांनी ही परंपरा अधिक समृद्ध व विकसित केलेली आहे. याच कालखंडात कादंबरीतील कथानकासोबतच निवेदनशैलीलाही विशेष महत्त्व प्राप्त झाले. नव्वदनंतरच्या कादंबरीतून मानवी जीवनव्यवहाराचे वास्तव दर्शन अधिक व्यापक व सखोलपणे घडते. घटना, व्यक्ती, वातावरण आणि निवेदन या घटकांच्या साहाय्याने मानवी जीवनाशी निगडित असणाऱ्या वास्तवाचे विविध स्तरीय, व्यामिश्र दर्शन नव्वदनंतरची कादंबरी घडविते.

या कालखंडातील एक महत्त्वाचे कादंबरीकार म्हणून रंगनाथ पठारे यांच्याकडे पाहिले जाते. पठारे यांच्या एकूण १४ कादंबऱ्या प्रकाशित असून 'दिवे गेलेले दिवस' (१९८२), 'रथ' (१९८४), 'चक्रव्यूह' (१९८९) आणि 'हारण' (१९९०) या नव्वदआधीच्या कादंबऱ्या आहेत. तर 'टोकदार सावलीचे वर्तमान' (१९९१), 'ताम्रपट' (१९९४), 'दु:खाचे श्वापद' (१९९५), 'नामुष्कीचे स्वगत' (१९९९), 'त्रिधा' (२००४), 'कुंठेचा लोलक' (२००६), 'भर चौकातील अरण्यरुदन' (२००८), 'एका आरंभाचे प्रास्ताविक' (२०१३), 'चोषक फलोद्यान' (२०१४) आणि 'सातपाटील कुलवृत्तांत' (२०१९) या नव्वदनंतरच्या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. लेखकाची नैतिकता, आशयाचे आत्मसातीकरण, देशीवादी जीवनभान यादृष्टीने रंगनाथ पठारे हे महत्त्वाचे कादंबरीकार ठरतात. जळजळीत भाष्ये, विलक्षण विधाने यांच्यामुळे त्यांचे लेखन असांकेतिक वाटत असले तरी त्यांच्या कथा-कादंबऱ्यांनी मराठी साहित्याच्या विकासात लक्षणीय कामगिरी केली आहे. पठारे यांच्या कादंबऱ्यातील अनुभवविश्वाचा आढावा घेण्याअगोदर शोधनिबंधाची उद्दिष्टे पाहणे क्रमप्राप्त ठरते.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

१. नव्वदोत्तर कालखंडातील कादंबरी वाङ्मयप्रकाराच्या प्रेरणा व प्रभाव समजून घेणे.
२. नव्वदोत्तर कालखंडातील कादंबरी वाङ्मयप्रकारातील रंगनाथ पठारे यांचे स्थान अधोरेखित करणे.
३. रंगनाथ पठारे यांच्या कादंबऱ्यातून आलेल्या अनुभवविश्वातील विविधतेची ओळख करून देणे.
४. रंगनाथ पठारे यांच्या समृद्ध अनुभवविश्वाने मराठी साहित्यात कोणती भर घातली, याचा शोध घेणे.
५. वाचकांची अभिरुची विकसित करण्यात रंगनाथ पठारे यांच्या कादंबरीचे योगदान अभ्यासणे.

 ISSN No. 2319-6025

## संशोधन पद्धती

'रंगनाथ पठारे यांच्या कादंबऱ्यातील अनुभवविश्व' या विषयावर अभ्यास करीत असताना आवश्यकतेनुसार वेगवेगळ्या संशोधन पद्धतींचा अवलंब केला गेला आहे. पठारे यांच्या कादंबऱ्यातील आशयाचा आणि अनुभवविश्वाचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीचे चिकित्सक विश्लेषण करण्यासाठी आणि व्यक्तिरेखांचा आढावा घेण्यासाठी मानसशास्त्रीय आणि मनोवैज्ञानिक संशोधन पद्धती वापरली आहे. तसेच या काळातील सामाजिक समस्या व समस्यांचे निराकरण याविषयी ऊहापोह करण्यासाठी समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

## पठारे यांच्या कादंबऱ्यांतील अनुभवविश्व

'दिवे गेलेले दिवस' ही रंगनाथ पठारे यांची पहिलीच कादंबरी. या कादंबरीमध्ये पठारे यांनी १९७५ च्या आणीबाणीचा कालखंड रेखाटला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात घडलेली ही राजकीय घटना असली तरी देशातील समाजजीवनावर या घटनेचा मोठा परिणाम जाणवतो. पठारे यांनी या काळातील सर्व घडामोडी त्यांच्या उपरोधिक शैलीच्या जोरावर वाचकांसमोर उभ्या केल्या आहेत. प्राध्यापक असणाऱ्या एका गृहस्थाला कोणीतरी फोनवरून धमकीवजा बोलत असते. 'तुमच्यावर लक्ष आहे', असे म्हणत असते. या घटनेमुळे प्राध्यापक फारच अस्वस्थ होतात. कॉलेज, प्राचार्य, सहकारी प्राध्यापक, मित्र, विद्यार्थी या सर्वांकडेच ते संशयाने पाहू लागतात. यातच या आणीबाणीचा फटका बसलेली एक स्त्री त्यांना भेटते. तिच्या दुःखी कहाणीने या प्राध्यापकांचा जीव सुन्न होऊन जातो. समाजवादी पुढारी, मुख्यमंत्री, मिसेस देवगिरीकर आणि त्यांच्या कविता, आमदार भास्करराव बेंडे या सर्वच व्यक्तिरेखा आणि त्यातून घडणाऱ्या गोष्टी प्राध्यापकांच्या विचलित मानसिकतेचे चित्रण करणाऱ्या आहेत. आणीबाणीचा राजकारणासाठी केला गेलेला उपयोग, सत्तालोलुपता, स्वार्थी समाजकारण यासारखे अनुभव पठारे यांनी प्रस्तुत कादंबरीत मांडले आहेत.

'रथ' ही रंगनाथ पठारे यांची दुसरी कादंबरी असून प्रस्तुत कादंबरीमध्ये त्यांनी वाङ्मयीन चळवळी आणि त्यातील बेरजेचे राजकारण यावर भाष्य केलेले आहे. याही कादंबरीत पठारे यांचा नायक प्रा. रावसाहेब निकम हे आहेत. प्रा. रावसाहेब निकम यांच्या साहित्याचे काहीजण कौतुक करीत असत तर काहीजण हेटाळणी करीत असत. यातूनच रावसाहेब आणि त्यांच्या सारखेच साहित्यावर आणि साहित्य संमेलनावर प्रेम करणारे प्रा. कानवडे यांच्यात मतभेद होतात. वाङ्मयीन चळवळीवर अधिपत्य कोणाचे असावे, यातून निर्माण होणाऱ्या वादाची परिणिती प्रस्तुत कादंबरीत पठारे यांनी चित्रित केलेली आहे. या चित्रणातून पठारे यांची ग्रामीण जीवनातील बारकावे विलक्षण आणि परिणामकारकपणे टिपणारी सूक्ष्म दृष्टी दिसून येते. ग्रामीण साहित्य चळवळीचा त्यांनी घेतलेला हा परामर्श वैशिष्ट्यपूर्ण आहे.

'चक्रव्यूह' या कादंबरीमध्ये पठारे यांनी मानवी जीवनातील विविध पातळ्यांवरील अनुभवांचा जिवंतपणे आविष्कार केलेला आहे. 'गोपीचंद' या नायकाच्या चित्रणातून समकालीन शिक्षण क्षेत्रातील विविध प्रवृत्तींचा नेमकेपणाने वेध घेण्याचे काम पठारे करतात. विद्यापीठीय अनुभवविश्वाबरोबरच मानवी मनातील गुंतागुंतीचा उलगडा पठारे यांनी या कादंबरीत केला आहे. सिनेट, अभ्यास मंडळ, शैक्षणिक मंडळे, त्यांच्या निवडणुका, त्यांच्या बैठका, विद्यार्थ्यांचे मोर्चे, कर्मचाऱ्यांची आंदोलने, परीक्षांचे घोटाळे, भ्रष्टाचार, निकालांचे विलंब, उत्तरपत्रिकांचे गायब होणे, पासाचे नापास आणि नापासाचे पास होणे, बळीचे बकरे बनविणे अशा अनेक गोष्टी पठारे यांनी मुखर केल्या आहेत.

'हारण' या कादंबरीत पठारे यांनी एका स्त्रीची करूण कहाणी रेखाटली आहे. प्रस्थापित समाजव्यवस्थेतील प्रतिकूल परिस्थितीचा आणि सभोवतालच्या पुरुषांमधील वासनांध वृत्तीचा 'हारण'च्या जीवनावर कसा भयावह परिणाम होतो, याचे प्रत्ययकारी चित्रण पठारे यांनी या कादंबरीत केले आहे. हारणचे वडील लोभी असून त्यांनी तिचे वयाच्या पंधराव्या वर्षी थोराड नारायणबरोबर लग्न लावले आहे. हारणचा पती नारायण हा अत्यंत भित्रा आणि लोभी माणूस आहे. बायकोशी कोणी गैरवर्तन करीत आहे, याच्यापेक्षा त्याला व्यवहार महत्त्वाचा वाटतो. शारीरिक सुख पूर्ण न होण्याचे दुःख पठारे यांनी हारणच्या अनेक विधानावरून दाखवून दिले आहे. एकूणच हारणचे संपूर्ण आयुष्य हे अस्थिर स्वरूपाचे असून प्रचंड दारिद्र्यामुळे तिची झालेली कुचंबणा विनाशाला जशी कारणीभूत ठरते, तसेच तिचे सौंदर्य तिच्या सुखी आयुष्याला काळिमा फासताना दिसते. पुरुषप्रधान संस्कृतीत हारणच्या वाट्याला आलेले दुःखी, कष्टी अनुभव पठारे यांनी प्रस्तुत कादंबरीत चित्रित केलेले आहेत.

'टोकदार सावलीचे वर्तमान' या कादंबरीचे नायक प्रा. गजानन भांगरे हे असून खूप कष्टाने त्यांनी शिक्षण पूर्ण करून नोकरी मिळविली आहे. त्यांनी मानवतावादी विचाराने प्रभाकर नावाच्या विद्यार्थ्याला आपल्या घरी राहण्यास आणले आहे. परंतु भांगरे यांची कन्या कुमुद आणि प्रभाकर अश्लील चाळे करताना सापडतात. यातून प्रा. भांगरे अस्वस्थ होतात. याचवेळी समाजात वाढलेल्या दांभिक व लुटारू प्रवृत्तीची ओळख नाना तांबट या गुंड व्यक्तिमत्त्वातून प्रा. भांगरे यांना होते. त्यांचा मानवतावादावरचा विश्वास ढळायला सुरुवात होते. प्रा. भांगरे यांची दुसरी मुलगी कावेरी हिच्या चित्रणातून पठारे यांनी सुखी वाटणाऱ्या पण खूप दुःखी जीवन जगणाऱ्या श्रीमंत मुलींचे दुःख, त्यांच्या जीवघेण्या वेदना दर्शविल्या आहेत. तर भांगरे यांची तिसरी मुलगी कमल ही धाडसी, हुशार आणि स्वाभिमानी, स्पष्ट विचारांची आहे. भांगरे यांना आलेल्या पहिल्या दोन मुलींचा अनुभव तितकासा बरा नसतो, त्यामुळे ते कमलवर अविश्वास दाखवितात, तिच्यावर पाळत ठेवतात. हे कमलला पटत नाही. ती घरातून निघून जाते. एकूणच पठारे यांनी प्रस्तुत कादंबरीत अनुभवविश्वाचा पसारा मांडताना सामाजिक जीवनातील घडामोडींचा सूक्ष्मपणे अभ्यास केल्याचे दिसते. पठारे यांनी प्रस्तुत कादंबरीत मानवी मनाचा वेध वास्तव पातळीवर घेतला आहे.

'ताम्रपट' ही पठारे यांची १९४२ ते १९७९ इतका काळाचा दीर्घ अवकाश असलेली एक महत्त्वाची कादंबरी आहे. भारताचा स्वातंत्र्यलढा आणि स्वातंत्र्यानंतरची सामाजिक, राजकीय स्थिती यावर भाष्य करणारी ही कादंबरी आहे. काही समीक्षकांनी 'आत्मभान हरवलेली बृहत् कादंबरी' असे वर्णन या कादंबरीचे केले असले तरी विशाल, व्यापक जीवनसंघर्षाच्या पार्श्वभूमीवर विराजमान असणाऱ्या मानवी करुणेचे दर्शन घडविणारी ही कादंबरी आहे, असे मला वाटते. नाना सिरूर आणि त्यांच्याशी संबंधित अनेक व्यक्तिरेखा यांच्या माध्यमातून पठारे यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा पट कलात्मकतेने उलगडला आहे. हा पट उलगडत असताना मात्र रसिकांना ही कादंबरी चिंतनाच्या पातळीवर घेऊन जाणारी आहे. या कादंबरीत आलेल्या आशयाचा आणि व्यक्तिरेखांचा आवाका पाहिला असता पठारे यांच्या प्रचंड अनुभवविश्वाची प्रचिती येते.

'दुःखाचे श्वापद' या कादंबरीतून पठारे यांनी एकाचवेळी राजकीय आणि शैक्षणिक अनुभवांचा वेध घेतला आहे. पठारे यांची ही कादंबरी मानवी मूल्यांच्या ऱ्हासाची व्यथा मांडणारी आहे. शिक्षणासारखे पवित्र क्षेत्रसुद्धा कसे तकलादू बनले असून सत्ताधाऱ्यांच्या हातातील बाहुले बनले आहे, यावर पठारे भाष्य करतात. शिक्षिका असलेल्या उल्हासबाई या नायिकेच्या माध्यमातून पठारे यांनी सामाजिक समस्यांचा ऊहापोह प्रस्तुत कादंबरीत केला आहे. उल्हासबाईचे सौंदर्य हेच तिच्या

 ISSN No. 2319-6025

मृत्यूस कारणीभूत होते, असे वास्तव पठारे मांडतात. प्रा. वालझाडे ही व्यक्तिरेखा या कादंबरीत निवेदनाची भूमिका पार पाडते. प्रा. वालझाडे यांच्या कादंबरीभर आलेल्या निवेदनातून सद्यकालीन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाढत चाललेली वासनांध वृत्ती अधोरेखित होते. अनेक छोट्यामोठ्या घटनांतून पठारे यांनी समाजातील महाभयंकर वृत्ती-प्रवृत्तींवर सूक्ष्मपणे प्रकाश टाकला आहे. एकूणच माणूस माणूसपण विसरून किती हिंस्त्र होत चालला आहे आणि संस्कृतीला गालबोट लागून माणसात राक्षसी प्रवृत्ती (श्वापद) कशी बळावते आहे, याचे चित्रण पठारे यांनी प्रस्तुत कादंबरीत केले आहे.

'नामुष्कीचे स्वगत' ही पठारे यांची कादंबरी जागतिकीकरणाच्या रेट्याचा खोलवर जाऊन विचार करायला लावणारी एक महत्त्वाची कादंबरी आहे. प्रस्तुत कादंबरीत स्त्री आणि पुरुष यांच्या जगण्यातील विविध पातळ्यांवरील नामुष्की, लढाई यांचे चित्रण आलेले आहे. भौतिक समृद्धी आणि त्यातून स्त्रीकडे पाहण्याची दृष्टी, स्त्री-पुरुष संबंधांकडे पाहण्याचा दृष्टिकोण, स्त्रीच्या भोगासाठी भांडवली पुरुष सत्तेमध्ये होणारे संक्रमण याची जाणीव पठारे करून देतात. त्याचबरोबर कार्पोरेट कल्चर, माहितीचे होणारे स्फोट, क्लोन्सचे प्रयोग, जनुकीय संशोधनाने उडवून दिलेला गोंधळ, भांडवलशाही तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या कृत्रिम गरजा, प्रसारमाध्यमांची भूमिका यासारखे अनुभवविश्व पठारे या कादंबरीच्या निमित्ताने अधोरेखित करतात. या कादंबरीत आलेल्या व्यक्तिरेखांमधून, उदाहरणार्थ जमालुद्दिन कासार, गोरोबा शिंपी, प्राचार्य, ६३ वर्षांची आजीबाई, मराठी आत्मचरित्र लेखक, एसटी ड्रायव्हर यांच्या व्यक्तिरेखांमधून आणि त्यांच्या जगण्या-वागण्यातून आलेली नामुष्की पठारे यांनी चित्रित केलेली आहे. यातून पठारे यांच्या समृद्ध अनुभवविश्वाचे दर्शन घडते.

'त्रिधा' या कादंबरीमध्ये पठारे यांनी कलावंताच्या आकलनापलीकडील निर्मितीप्रक्रियेचा शोध घेतलेला आहे. या कादंबरीच्या निमित्ताने पठारे यांनी स्त्री-पुरुष संबंधांचे आकलन आणि मानसिक विकृतीमागील घटीताचा शोध घेतला आहे. या कादंबरीत निवेदक असणारा लेखक स्वतःला निर्मिक मानून समन्वयाचा विचार करतो आहे. निर्मिती प्रक्रियेविषयी त्याला स्वतःची अशी भूमिका आहे. त्याची ही भूमिका कादंबरीच्या सुरुवातीस येते. कादंबरीच्या पुढील भागात लेखकाने वकील आणि वकीलीणबाई, डॉक्टर आणि डॉक्टरीणबाई, प्रोफेसर आणि प्रोफेसरीणबाई या तीन जोडप्यांची ओळख करून देऊन पुढील काळात त्यांच्यात वाढत गेलेला ताण पठारे यांनी चित्रित केला आहे. या ताणाचे कारण प्रत्येकाचे एकाकी जीवन हे आहे. लैंगिक असमाधान आणि त्यातून उद्भवणाऱ्या विकृतीतून त्यांचे वागणे अनिर्बंध होत जाते. प्रोफेसर यांचे लैंगिक समाधानासाठी वेश्यागृहापर्यंत जाणे, हे याचेच द्योतक आहे. एकूणच प्रोफेसरांचे जगणे एकीकडे आणि निर्मिती एकीकडे, असे संपूर्ण कादंबरीभर दिसून येते.

'कुंठेचा लोलक' ही पठारे यांची विचारप्रवृत्त करायला लावणारी एक महत्त्वाची कादंबरी आहे. चौफेर अशा जीवनानुभवातून आलेले वास्तव अनुभव पठारे यांनी या कादंबरीत चित्रित केलेले आहेत. बाळू नेटके हा या कादंबरीचा नायक असून तो शिक्षक आणि पत्रकार आहे. तो अत्यंत लालची आणि भ्रष्ट आहे, पण दुष्ट प्रवृत्तीचा नाही. रेवती ही त्याची पत्नी, पण तो तिला शारीरिक सुख देऊ शकत नाही. त्यातूनच रेवतीचे पोपटीबाईच्या मदतीने बाळूचा मित्र फडतरे याच्याशी शारीरिक संबंध येतात. ही गोष्ट बाळूला कळल्यानंतर रेवती व बाळू यांच्यात भांडण होऊन रेवती घर सोडून जाते. बाळूला आपली चूक लक्षात आल्यानंतर रेवतीला घरी परत आणण्यासाठी तो प्रयत्न करू लागतो. त्याची समस्या तो डॉक्टरांच्या सल्ल्याने, औषधाने दूर

करतो. कादंबरीमध्ये फडतरे, पोपटीबाई, राजकीय पुढारी, रेवतीचा मामा अशा अनेक वासनांध व्यक्तिरेखांचे दाखले येतात. या दुष्ट, हलकट, संधीसाधू प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखांमधून पठारे यांच्या अनुभवविश्वाची प्रचिती येते.

'भर चौकातील अरण्यरुदन' या कादंबरीमध्ये पठारे यांनी समाजात प्रचलित असणारी अन्यायी व्यवस्था व तिच्या विरोधात लढताना बळी पडलेला दीन, दलित समुदाय याचे चित्रण केलेले आहे. मलराज होसमुनी हा या कादंबरीचा नायक असून मोलमजुरी करून तो जगतो आहे. समाजातील अन्यायी व्यवस्था त्याच्या निरक्षरतेचा फायदा घेते. त्यांच्या विरोधात लढण्यासाठी होसमुनी उपोषणाला बसतो. त्याला न्याय मिळत नाही. त्याच्यातच त्याचा बळी जातो. किड्या-मुंग्यांसारखे जगणारे असे कितीतरी जीव दररोज जात असतात, हे आजच्या आधुनिक शहरात कुणाच्याही लेखी नसते. पत्रकार सुनील निकाळजे होसमुनीच्या मृत्युच्या मुळापर्यंत जाण्यासाठी धडपडतो आहे, पण त्याला यश येत नाही. होसमुनीची पत्नी चेन्नम्मा हिच्या दुःखाची परिसीमासुद्धा या कादंबरीत पाहायला मिळते. एकूणच पठारे यांनी प्रस्तुत कादंबरीतून अन्यायी व्यवस्था व त्यात गुरफटलेला समुदाय याचे वास्तव चित्रण केले आहे.

'चोषक फलोद्यान' या कादंबरीतून पठारे यांनी बंदिस्त वातावरणात स्मृती हरवलेल्या लेखकाचे भावविश्व अधोरेखित केलेले आहे. पूर्वायुष्यात या लेखकाने जे अनुभवले आहे, ते आठवून स्वतःशीच संवाद साधण्याचा प्रयत्न करताना तो दिसतो. यातील काही घटनांचा त्याला परस्परांशी संबंध वाटतो, तर काही घटनांचा एकमेकींशी मेळ घालणे कठीण असल्याचे निवेदक असणारा लेखक सांगतो. कादंबरीत निवेदक असणारे लेखक रामराव पाटील हे कौटुंबिकदृष्ट्या समाधानी नाहीत. त्यामुळे ते कोणत्या तरी जोडीदाराच्या शोधात आहेत. त्यांना हा जोडीदार इंटरनेटच्या माध्यमातून सापडतो. लेखकाच्या स्वभावाशी मिळतीजुळती असणारी नेत्रा नावाची घटस्फोटीत स्त्री त्यांना जोडीदार म्हणून मिळते. ते दोघेही या नव्या नात्याचा मनमुराद आनंद घेतात, पण लेखकाला ही एक शक्यता वाटत राहते. कादंबरीच्या पुढील भागात लेखकाची तिरशिंगराव या मंत्र्याने ठेवलेल्या स्त्रीशी म्हणजेच सुनेत्राशी ओळख होते. त्यांच्यातील संबंध मंत्र्याला समजताच तो लेखकाला बदनाम करतो. नंतरच्या काळात लेखकाला त्या मंत्र्यापासून वाचण्यासाठी बौद्ध साधूच्या वेशात राहावे लागते. साधूचा बोलबाला वाढतो. एकेदिवशी अचानक साधूच्या भेटीला सुनेत्रा येते. पुन्हा नजरेचा खेळ सुरू होतो व पुन्हा मंत्री लेखकाचा गाशा गुंडाळतो. नंतरच्या काळात लेखकाच्या आयुष्यात सुलोचनाबाई, आसराबाई, कामाक्षी या स्त्रिया येतात. या सर्वच व्यक्तिरेखांमधून डोळ्यात डोळे घालुन नेत्राग्य मैथुन करण्याच्या सवयीमुळे निवेदक लेखकाची झालेली दुरावस्था पठारे यांनी या कादंबरीत चित्रित केलेली आहे.

'सातपाटील कुलवृत्तांत' ही रंगनाथ पठारे यांची बृहत् कादंबरी आहे. या कादंबरीचा नायक हा एकविसाव्या शतकातील आधुनिक जाणिवांचा, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेला, नास्तिक प्राध्यापक आहे. त्याला कर्मकांडाचा तिटकारा आहे, परंतु कुटुंबाची, कळपाची गरज म्हणून तो ते निमूटपणे विनातक्रार करीत आहे. अशाच एका प्रसंगी तो आपला कुलवृत्तांत कथन करीत आहे. हा कुलवृत्तांत म्हणजेच ही कादंबरी आहे, असे म्हणता येईल. कादंबरीची सुरुवात तेराव्या शतकापासून अल्लाउद्दीन खिलजीच्या पैठणवर केलेल्या आक्रमणापासून होते. तिथून पठारे इतिहासाचा वेध घेत मलिक अहमद निजामशहाचा कार्यकाळ, पानिपतचे युद्ध, दुसऱ्या बाजीरावाचा काळ, ईस्ट इंडिया कंपनी ते थेट एकविसावे शतक असा विस्तृत पट मांडतात. श्रीपती, साहेबराव, दसरथ, जानराव, पिराजी, शंभुराव


ISSN No. 2319-6025

आणि देवनाथ हे या कादंबरीचे नायक आहेत. या नायकांची सुख-दुःखं, नाती, कौटुंबिक कलह, त्या त्या काळातील जगण्याचे, जाणिवांचे संदर्भ पठारे यांनी टोकदारपणे चित्रित केलेले आहेत. याचबरोबर मिथकांचे, संस्कृतीच्या विविध अंगाचे, मानवी भावभावनांचे, देव-देवतांच्या आख्यायिकांचे, मिथकांच्या समांतर आणि पर्यायी भानाचे असे अनेक सूक्ष्म दोर या कादंबरीत प्रत्ययास येतात.

**समारोप**

रंगनाथ पठारे हे विज्ञान शाखेतील भौतिकशास्त्र विषयाचे प्राध्यापक असूनसुद्धा त्यांनी मराठी साहित्यात खूप मौलिक भर घातली आहे. आधुनिकता आणि व्यक्तिस्वातंत्र्य या समकालीन मूल्यव्यवस्थांची चिकित्सा, विश्लेषण करण्याची लेखनप्रेरणा पठारे यांच्या कादंबऱ्यांमध्ये आढळते. पठारे यांच्या अनुभवविश्वाविषयी राजन गवस म्हणतात, ''वर्तमान जीवन जगत असताना जे जे अनुभव लेखकाला भिडतात, अस्वस्थ करतात, त्या त्या अनुभवांना तो शब्दबद्ध करतो. त्यामुळे त्यांचे साहित्य हे त्यांच्या काळाची संवेदना व्यक्त करते. याठिकाणी पठारे त्यांच्या समकालीन लेखकांपेक्षा वेगळे ठरतात. त्यांच्या समकालीन लेखकांमध्ये कोणी फक्त ग्रामीण, फक्त दलित, फक्त मध्यमवर्गीय लेखनाचा पुरस्कार करून त्याच वर्तुळात फिरत राहणे पसंत करतात. त्यामुळे प्राप्त होणारी मर्यादा ते ओलांडू शकत नाहीत. पण ती मर्यादा पठारे ओलांडतात. हे लेखक म्हणून त्यांचे यश आहे.'' राजन गवस यांनी केलेले हे विधान निश्चितच पठारे यांच्या व्यापक आणि सजग अनुभवविश्वाची प्रचिती देणारे आहे, असे म्हणता येईल. एकूणच अभ्यासाअंती हाती आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**निष्कर्ष**

१. पठारे जीवनाच्या आशयद्रव्याची, अस्तित्वस्वरूपाची गंभीर चिकित्सा आपल्या कादंबऱ्यांमधून करताना दिसतात.
२. सामान्य किंवा फारसे महत्त्वाचे न वाटणारे घटनाप्रसंग, स्त्री-पुरुष, उक्ती या सर्वांनाच कल्पक साधनेच्या बळावर पठारे नवरूप देतात किंवा असांकेतिक अस्तित्व प्रदान करतात.
३. पठारे आपल्या कादंबरीतून विरूपांचे भाषिक पातळीवर निवेदनाच्या खास दृष्टिकोनातून नवे आणि वेगळे दर्शन घडवितात.
४. रंगनाथ पठारे औपरोधिकता, रोखठोकपणा, वक्रता या शैलीतंत्राचा भाषिक वापरात मोठा वावर घडवून आणतात आणि कथन, निवेदन आणि भाष्यही आकर्षक बनवितात.
५. पठारेंच्या कादंबऱ्यांतून आलेल्या अनुभवविश्वाची व्याप्ती पाहता त्यांच्या निरीक्षण शक्तीचा आणि भाषा सामर्थ्याचा प्रत्यय येतो.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. गवस, राजन - 'तिरकसपणातील सरळता', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, १९९५.
२. खोले, विलास (संपा.) - 'गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी', लोकवाङ्मय गृह, मुंबई, तिसरी आवृत्ती, २०११.
३. वाघमारे, राम-'समकालीन कादंबरीकार : नेमाडे व पठारे', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१५.
४. सलालकर, राजेंद्र-'रंगनाथ पठारे यांच्या साहित्यातील स्त्री-दर्शन', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१५.

●●